# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १४/०२/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक
## पोलिस स्टेशन कन्हान ची कार्यवाही

दिनांक १३/०२/२०२२ रोजी फिर्यादी पोलिस शिपाई विषाल शंभरकर पो.स्टे. कन्हान हे स्टॉपसह पोस्टे परिसरात पेट्रोलींग करित असतांना जे.एन.हॉस्पीटल जवळ गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशिर बातमी मिळाली की, मौजा खदान क्र. ६ येथे राहणारा बल्लन श्यामराव गोस्वामी हा स्वत: जवळ देशी कट्टा बाळगतो. अश्या मिळालेल्या माहीती वरून दिनांक १३/०२/२०२२ चे १४:३० वा. ते १५:३० वा. दरम्यान इंडीयन बॅंक जवळ खदान क्र. ६ येथे जावुन पाहणी केली असता यातील आरोपी नामे— बल्लन श्यामराव गोस्वामी, वय ३१ वर्ष, रा. इंदरकॉलनी खदान नं. ६ इंडियन बॅंकजवळ कन्हान हा दिसुन आल्याने त्याची झडती घेतली असता त्याचे फुलपॅन्टचे जिन्स समोरील भागात एक देशी बनावटीचा कट्टा किं. १७,०००/—रू. चा मुद्देमाल स्वत: जवळ बाळगुन मिळून आला. सदर हत्यारा बाबत आरोपीला परवाना विचारला असता त्याच्या जवळ कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मिळुन आले नाही.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलिस शिपाई विशाल शंभरकर, पोस्टे. कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री. मेश्राम मो.क्र. ९०६७१७६६९४ हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, पोलीस उपअधिक्षक श्री मुख्तार बागवान कामठी विभाग कामठी यांचे मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास काळे, सहा. पोलीस निरीक्षक सतिश मेश्राम, पोलीस नाईक राहुल रंगारी, राजेन्द्र गौतम, पोलीस शिपाई संदीप गेडाम यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर